CMYK

# साऊथ ब्लॉकमध्ये संरक्षण मंत्रालयाच्या बैठकीत मोठा निर्णय


मदन वामन पातूरकर विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय डोणगाव ची वार्षिक आढावा बैठक उत्साहात संपन्न >>पान 2

काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहीर, नोंद करुन घ्या! >>पान 3

बुलढाणा जिल्ह्यातील ५० पर्यटक जम्मू काश्मिरमध्ये! >>पान 4


**सुविचार**

जीवनात नविन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करा.


दैनिक **आपला विदर्भ**

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 251 ■ गुरुवार, दि. 24 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




# भारतीय सैन्याच्या तिन्ही दलांना तयार राहण्याच्या सूचना

**नवी दिल्ली : काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार करुन २६ भारतीयांचा जीव घेतल्यानंतर आता केंद्र सरकारकडून कठोर पावले उचलण्याचे संकेत देण्यात आले आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्याची बातमी समजल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून बुधवारी सकाळी दिल्लीत परतले होते. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी विमानतळावरच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याशी चर्चा केली. यानंतर दिल्लीच्या साऊथ ब्लॉकमधील केंद्रीय संरक्षण मंत्रालयात तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख, अजित डोवाल आणि संरक्षण मंत्रालयाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर भारतीय सैन्यदलाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारत आता पाकिस्तानावर पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक किंवा एअर स्ट्राईक करणार का, अशी चर्चा सुरु झाली आहे.**



काहीवेळापूर्वीच संरक्षण मंत्रालयात ही बैठक पार पडली. या बैठकीला तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीअंती तिन्ही दलाच्या प्रमुखांना आपापले सैन्य तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विशेषत: भारतीय वायूदल आणि नौदलाला अलर्ट मोडवर राहण्याचा आदेश मिळाला आहे. कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार राहा, असे सैन्यदलाला सांगण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही तासांमध्ये अथवा दिवसांमध्ये काहीतरी मोठी घटना घडू शकते का, याविषयी तर्कवितर्क बांधले जात आहेत. गेल्या काही तासांपासून दिल्लीत वेगवान घडामोडी सुरु आहेत.

काहीवेळापूर्वीच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे पहलगाम येथे हल्ला झाला त्या बैसरन व्हॅलीत दाखल झाले. अमित शाह हेलिकॉप्टरने याठिकाणी उतरले. त्यानंतर अमित शाह यांनी हल्ला झालेल्या ठिकाणाची फिरुन पाहणी केली. अमित शाह याठिकाणी हल्ला कसा झाला, याची सगळी माहिती घेऊन त्याचा अहवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देणार आहेत. दिल्लीत गेल्या काही तासांपासून महत्त्वाच्या बैठका सुरु आहेत. संरक्षण मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ अनिल चौधरी यांची एक उच्चस्तरीय बैठक संरक्षण मंत्रालयात सुरु आहे. पंतप्रधान मोदी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून या सगळ्या बैठकांमध्ये सहभागी होत असल्याची माहिती आहे. त्यामुळे पुढील काही तासांमध्ये दिल्लीत महत्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे.

## पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर सुरक्षा दल ॲक्शन मोडमध्ये, १५०० हून अधिक जणांना घेतलं ताब्यात

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्लयानंतर सुरक्षा दलांनी कारवाईला सुरुवात केली आहे. सुरक्षा दलांनी खोऱ्यातून १५०० हून अधिक लोकांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये ओव्हर ग्राउंड वर्कर्स किंवा दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या लोकांचा समावेश आहे. पहलगाममध्ये काल दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे, तर अनेतजण जखमी झाले आहेत.

दरम्यान, जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्लयानंतर या भागातील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. हल्लयानंतर सीमावर्ती राज्य पंजाबनेही सुरक्षा वाढवली आहे. या दहशतवादी हल्लयानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज (२३ एप्रिल २०२५) घटनास्थळी भेट दिली. घनदाट पाइनच्या जंगलांनी वेढलेल्या लोकप्रिय पर्यटन स्थळी दहशतवादी ज्या मार्गाने पोहोचले असावेत, त्या घटनांचा क्रम आणि संभाव्य मार्गांबाबतही गृहमंत्र्यांना माहिती देण्यात आली आहे. हे ठिकाण श्रीनगरपासून ११० किलोमीटर अंतरावर आहे.

## काश्मीरमध्ये पोलिसांनी दहशतवाद्यांचे स्केच केले जारी; सर्वत्र शोध सुरू, संशयितांची कसून चौकशी



**श्रीनगर :** जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयातील संशयित हल्लेखोराचा पहिला फोटो समोर आला होता. हा फोटो घटनेच्या ठिकाणचा आहे, ज्यामध्ये तो हल्ला करणारा दहशतवादी हातात बंदूक धरलेला दिसत आहे, जरी त्याचा चेहरा स्पष्ट दिसत नाही. हल्लयानंतर सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसरात शोध मोहीम सुरू केली आहे. एनआयएचे पथक श्रीनगरला पोहोचले आहेत आणि फॉरेन्सिक तज्ञ देखील घटनास्थळाची तपासणी करत आहेत. लष्कर, सीआरपीएफ, एसओजी आणि जम्मू काश्मीर पोलिसांनी परिसराला वेढा घातला आहे. दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी हेलिकॉप्टर आणि ड्रोनचीही मदत घेतली जात आहे. यादरम्यानच पहलगाम हल्लयातील संशयित दहशदवाद्यांचे स्केच जारी करण्यात आले आहेत.

जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी पहलगाम हल्लयात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांचे रेखाचित्र जारी केले आहेत. त्या ठिकाणी असलेल्या पर्यटकांशी बोलून ही रेखाचित्रे तयार करण्यात आली आहेत. त्या दहशतवाद्याचा तपास सुरू करण्यात आला आहे. तीन हल्लेखोरांचे स्केच बनवण्यात आलेले आहे. हा हल्ला ७ ते ८ जणांनी हल्ला केल्याची माहिती आहे. मात्र, त्यापैकी तिघांचे स्केच बनवण्यात आले आहेत. हे ३ दहशतवादी आसिफ फौजी, सुलेमान शाह आणि अबू तलह यांची रेखाचित्रे आहेत. त्यांचा कसून तपास घेतला जात आहे. दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी हेलिकॉप्टर आणि ड्रोनचीही मदत घेतली जात आहे. यादरम्यानच पहलगाम हल्लयातील संशयित दहशदवाद्यांचे स्केच जारी करण्यात आले आहेत. पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर, सर्व लष्करी तुकड्यांना सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जम्मू-काश्मीरच्या नियंत्रण रेषेवर आणि अंतर्गत भागातही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे

**नांदेड :** जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम मध्ये दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्याचा सर्वत्र निषेध करण्यात येतोय. महाराष्ट्रातील दोन पर्यटकांचा या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. नांदेड मध्ये या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. नांदेड शहरातील महात्मा फुले चौकात मेणबत्ती पेटवत भाजपाच्या वतीने या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. पाकिस्तानला पाकिस्तान मध्ये घुसून जशास तसे उत्तर देण्यात यावे.

**–प्रवीण साले, माजी महानगराध्यक्ष, भाजपा नांदेड.**

### पर्यटकवर्ग दहशतीखाली

**कोल्हापूर :** पहेलगाम दहशतवादी हल्ल्यात कोल्हापूर येकोल्हापूर येथील पर्यटक थोडक्यात बचावले. काश्मीर मधील हल्ल्यातून थोडक्यात बचावलेले कोल्हापुरातील पर्यटक पर्यटनासाठी गेले असताना ज्या ठिकाणी जायचे होते तिथे जाणार होते. अनिल कुरणे हे त्यांची पत्नी आणि आईसह गेलेत पहेलगाम येथे पर्यटनाला. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील काही पर्यटक त्यांच्यासोबत. पर्यटकांवर गोळीबार झाल्याचे समजताच सर्वजण भीतीच्या छायेखाली आहेत.

**–अनिल कुरणे, कोल्हापूरचे पर्यटक**

### आम्ही सध्या सुरक्षित मात्र, इथून लवकर निघावे असा आमचा प्रयत्न

**जळगाव :** आम्ही चाळीसगाववरून १४ लोक परवा पहेलगाम येथे आलो होतो. काल आम्ही श्रीनगर मध्ये स्टे केला. त्यानंतर आम्ही सोनबर्गला गेलो. मात्र, आमच्या या दुर्दैवी घटनेमुळे आम्ही खूप घाबरलो आहोत.बाहेरची परिस्थिती पाहिली तर, बाहेर हाय अलर्ट आहे. जागोजागी सैनिक तैनात आहेत. त्यामुळे लवकरात लवकर या ठिकाणाहून जाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.आम्ही सध्या सुरक्षित आहोत. मात्र, इथून लवकरात लवकर निघावे असा आमचा प्रयत्न सुरू आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी देखील आमच्या संपर्कात आहेत.

**– देवयानी ठाकरे, जळगाव.**

### काश्मीर येथे अडकलेले १८२ पर्यटक श्रीनगरहून मुंबईला येणार

**पुणे :** महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी विशेष विमानांची व्यवस्था करण्यात आली आहे. उद्या दोन विमान श्रीनगरहून मुंबईकडे येणार आहेत.पर्यटकांना मोफत आणण्याची व्यवस्था आहे. इंडिगो आणि एअर इंडियाच्या विमानांची व्यवस्था झाली आहे. उद्या १८२ पर्यटक श्रीनगरहून मुंबईला येणार आहेत. विमानांचा खर्च राज्य सरकार देणार आहे.

**–मुरलीधर मोहोळ,केंद्रीय राज्यमंत्री.**

## दहशतवादी हल्ल्याचा देशभरात निषेध

### विविध पदाधिकाऱ्यांकडून संतप्त प्रतिक्रिया



**मुंबई : कश्मीर येथील पहलगाम येथे २३ एप्रिल रोजी आतंकवाद्यांनी पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला. आणि या गोळीबारामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे संपूर्ण देशभरामध्ये आता आतंकवादांच्या विरोधात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. आता सर्वसामान्य देखील आतंकवाद्यांना कायमचा धडा शिकवावा, अशी मागणी करत आहेत. त्यातच काही ठिकाणी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निषेध आंदोलन केले करण्यात आली. आतंकवाद्यासोबत पाकिस्तानला धडा शिकवावा अशी मागणी यावेळेस शिवसैनिकांनी केली. तर, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करून आपला तीव्र रोष व्यक्त केला आहे.**

### नातेवाईकांनी चिंता करून नये



**पुणे :** झालेल्या दुर्दैवी घटनेनंतर पुण्यातील दोन कुटुंब गेले त्यातील दोन पुरुषांचा मृत्यू झाला आहे. संतोष जगदाळे आणि गनबोटे या दोघांचा मृत्यू झाला आहे. आज सायंकाळी या दोघांचे मृतदेह सहा वाजता तिकडून निघतील. जे पर्यटक अडकले आहेत. त्यांना आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.श्रीनगर टू दिल्ली स्पेशल विमानाने आणले जाईल. पुण्यातील जवळपास १५० लोक अडकले आहेत. त्यांना आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आज नाही जमलं तर, उद्या नक्की या सर्वांना इकडे आणण्यात येईल. श्रीनगर जिल्हाधिकारी यांच्याशी सातत्याने दूरध्वनीवरून मी माहिती घेत आहे. गृह विभाग अधिकारी जय महाराष्ट्रातल्या आहेत. ते मदत करण्याचे काम करत आहेत. नातेवाईकांनी चिंता करू नये, आम्ही सगळे सोबत आहोत.

**– मुरलीधर मोहोळ,केंद्रीय राज्यमंत्री.**

उर्वरिती प्रतिक्रिया पान ३ वर....

### पंतप्रधानांनी खंबीरपणे भूमिका घेऊन २६ चा बदला २६० ने घ्यावा



**बुलढाणा :** पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत संपूर्ण भारताच्या भावना अतिशय तीव्र आहेत. ज्या पद्धतीने धर्म पाहून, जात पाहून, लिंग तपासून म्हणजे जे कृत्य १९८७ सालापासून कश्मीरमध्ये चालू होते. की गावो-गावाच्या गाड्या अडवायच्या माणसांना खाली उतरायचं महिलांच्या कपाळाच कुंकू पहायच, कुंकू असेल तर बलात्कार करायचा, लिंग तपासायचे हिंदू असेल तर, गोळ्या घालायच्या. हे क्रूर कृत्य पाकिस्तान ने केले. हा इस्लाम आतंकवाद आहे. हा पाकिस्तानचा आतंकवाद आहे. जम्मू कश्मीर मधल्या हिंदू लोकांना भारतीय हिंदू लोकांना खतम करायचा हा यांचा आतंकवाद आहे.. त्यामुळे देशाच्या पंतप्रधानांनी खंबीरपणे भूमिका घेऊन २६ चा बदला २६० ने कसा घेतला जाईल, हे पाहावे.

**संजय गायकवाड, आमदार बुलढाणा.**

### पर्यटकांना परत आणण्यासाठी शासन व प्रशासनाच्या संपर्कात



**अमरावती :** काश्मीर येथे अडकलेल्या अमरावतील पर्यटकांची व्हिडीओ कॉलद्वारे केली विचारपूस केली आहे. पहलगाम येथे काल पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. अमरावती जिल्ह्यातील काही पर्यटक जम्मू आणि काश्मीर येथे अडकलेले आहेत. पर्यटकांशी संपर्क साधून त्यांची विचारपूस करत त्यांना धीर दिला. अमरावती जिल्ह्यातील पर्यटकांना परत आणण्यासाठी त्या सतत शासन व प्रशासनाच्या संपर्कात आहेत.

**–ॲड. यशोमती ठाकूर, माजी मंत्री, अमरावती.**

### आतंकवाद्यांना कायमचा धडा शिकवावा

**परभणी :** काल कश्मीर येथील पहलगाम येथे आतंकवाद्यांनी पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला. आणि या गोळीबारामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे संपूर्ण देशभरामध्ये आता आतंकवादांच्या विरोधात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. आता सर्वसामान्य देखील आतंकवाद्यांना कायमचा धडा शिकवावा, अशी मागणी करत आहेत. त्यातच आज शिवसेना शिंदे गटाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला आणि निषेध आंदोलन केले. आतंकवाद्यासोबत पाकिस्तानला धडा शिकवावा.

**– सुरेश जाधव, माजी खासदार परभणी.**

CMYK

## क्रिकेटच्या देवाचा वाढदिवस

क्रिकेट हा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे म्हणूनच क्रिकेट हा भारताचा धर्म आहे असे मानले जाते आणि खेळात सचिन तेंडुलकर याने जी असामान्य कामगिरी केली आहे त्यामुळे त्याला क्रिकेटचा देव मानले जाते. आज याच क्रिकेटच्या देवाचा म्हणजे सचिन तेंडुलकरचा ५२ वा वाढदिवस आहे. २४ एप्रिल १९७३ रोजी मुंबईत सचिनचा जन्म झाला. त्याचे वडील रमेश तेंडुलकर हे प्राध्यापक होते तसेच मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक होते तर आई शिक्षिका होत्या. त्या काळातील प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मन ह्यांच्या नावावरुन त्याचे सचिन असे नाव ठेवण्यात आले. सचिनने शारदाश्रम विद्यामंदिर या शाळेत रमाकांत आचरेकर यांच्याकडून क्रिकेटचे धडे गिरवायला सुरवात केली. रमाकांत आचरेकर यांनी बालवयातच सचिनची गुणवत्ता हेरुन त्याला प्रशिक्षण दिले. शाळेत असतानाच सचिनने त्याच्या शाळेतील सहकारी मित्र विनोद कांबळी याच्यासोबत हॅरिस शिल्ड स्पर्धेत ६६४ धावांची विक्रमी भागीदारी रचली. सचिनने त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातच शतक झळकवण्याचा विक्रम केला. तेंव्हा त्याचे वय १५ वर्ष २३२ दिवस होते आणि त्यावेळी पहिल्या सामन्यात शतकी खेळी करणारा तो सर्वात तरुण खेळाडू होता. सचिन हा असा एकमेव खेळाडू आहे ज्याने रणजी, दुलीप व इराणी चषकाच्या पहिल्या सामन्यात शतक झळकावले. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी केल्याने वयाच्या १६ व्या वर्षीच सचिनची भारतीय संघात निवड झाली. १९८९ साली त्याने आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना पाकिस्तान विरुद्ध कराची येथे खेळला. त्या सामन्यात त्याने इम्रान खान, वसीम आक्रम, वकार युनूस, अब्दुल कादिर या दिग्ग्ज गोलंदाजांचा सामना केला. अर्थात त्याला पहिल्या सामन्यात विशेष काही करता आले नाही. अवघ्या १५ धावांवर तो बाद झाला मात्र पुढच्या सामन्यात त्याने अर्धशतक झळकावुन आपल्या क्षमतेची चुणूक जगाला दाखवून दिली. त्यानंतर तो भारतीय संघासोबत न्यूझीलंड दौऱ्यावर गेला तिथे ८८ धावांची त्याने लाजवाब खेळी केली मात्र त्याला खरी ओळख मिळाली ती १९९१ – ९२ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात. या दौऱ्यात त्याने पर्थ मधील उसळत्या आणि वेगवान खेळपट्टीवर शतकी खेळी केली. ज्या खेळपट्टीवर जगभरातील दिग्गज फलंदाज तग धरू शकत नाही अशा खेळपट्टीवर सचिनने ऑस्ट्रेलियाच्या दर्जेदार गोलंदाजीसमोर शतक झळकवल्याने हा खेळाडू लंबी रेस का घोडा आहे असे जाणकार म्हणू लागले. त्यानंतर सचिनने मागे वळून पाहिले नाही. जगभरातील सर्वच खेळपट्टीवर त्याने धावा काढायला सुरवात केल्या. १९९६ च्या विश्वचषकात त्याने सर्वाधिक धावा काढून गोल्डन बॅट मिळवली. १९९० च्या दशकात तर सचिनच्या बॅटने अक्षरशः धुमाकूळ घातला. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, पाकिस्तान, श्रीलंका, झिम्बाब्वे अशा सर्वच संघविरुद्ध त्याने खोऱ्याने धावा केल्या. १९९७ साली विसडेनने त्याला त्या वर्षीचा सर्वोत्तम वार्षिक खेळाडू म्हणून घोषित केले. ह्याच वर्षी त्याने पहिल्यांदा कसोटीत १००० धावा केल्या. ह्याची सचिनने १९९९, २००१, २००२ साली पुनरावृत्ती केली. सचिनने वर्षात १००० पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम सलग सहा वेळा केला आहे. असा करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सचिन तेंडुलकर हा क्रिकेट विश्वात डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा क्रिकेटपटू आहे. २००२ मध्ये कारकिर्दीच्या बाराव्या वर्षीच, विसडेनने डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर सार्वकालिक दुसरा सर्वोत्तम कसोटीपटू व व्हीव्ह रिचर्डस नंतरचा दुसरा सार्वकालिक सर्वोत्कृष्ट एकदिवसीय फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरची निवड केली होती. स्वतः डॉन ब्रॅडमन यांनी सचिनच्या फलंदाजीत स्वतःची छबी दिसते असे म्हटले होते. २००३ साली दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेत त्याला मालिका विराचा पुरस्कार देण्यात आला मात्र संघाला विश्वचषक जिंकता आला नाही याची त्याला खंत होती. देशाला विश्वचषक जिंकून द्यायचे हे त्याचे स्वप्न होते. हे स्वप्न २०११ साली पूर्ण झाले. सचिनचे दुसरे नाव म्हणजे विक्रम. विक्रमांचे विक्रम करण्याची असाधारण कामगिरी त्याने केली. त्यांचे विक्रम सांगायला गेलो तर पानही पुरणार नाही. आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० शतक करणारा तो एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक धावा, सर्वाधिक सामनावीर, सर्वाधिक मालिकाविर , सर्वात जास्त सामने असे कितीतरी विक्रम त्याच्या नावे आहे. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्याला गौरविण्यात आले आहे. भारतरत्न या देशाचा सर्वोच्च पुरस्काराने देखील त्याला गौरविण्यात आले. भारतरत्न मिळवणारा तो एकमेव खेळाडू आहे. तो राज्यसभेचा खासदारही होता. भारतीय हवाई दलाने त्याला ग्रुप कॅप्टन हा गौरवात्मक हुद्दा प्रदान केला आहे. त्याला अनेक विद्यापीठाची डिलीट ही मानाची पदवी मिळाली आहे. सचिनचा खेळ पाहतच आम्ही लहानाचे मोठे झालो. त्याचा खेळ पाहायला मिळाला हे आमच्या पिढीचे भाग्य. १४० कोटी भारतीयांना आनंद साजरा करण्याची संधी सातत्याने निर्माण करुन देणाऱ्या या क्रिकेटच्या देवाला ५२ व्या वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !

# मदन वामन पातूरकर विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय डोणगाव ची वार्षिक आढावा बैठक उत्साहात संपन्न

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात सतत दोन वर्षापासून डोणगाव केंद्रातून प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या आणि डोणगाव पंचक्रोशीत उपक्रमशील विद्यालय म्हणून प्रसिद्ध असलेल्या मदन वामन पातूरकर विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व तो सर्वगुणसंपन्न व्हावा या उद्देशाने वर्षभर शालेय अभ्यासक्रमाबरोबर विविध सहशालेय उपक्रमाअंतर्गत थोर पुरुषांची जयंती ,पुण्यतिथी, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम ,प्रशासन व व्यवस्थापन इत्यादी उपक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन केले जाते.

या सर्व कार्यक्रमांचा आढावा वर्षाच्या शेवटी घेतल्या जातो.यावर्षी सन २०१४-२५ ची वार्षिक आढावा बैठक बुधवार दि २३ एप्रिल २०२५ ला शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामकृष्णदादा शेटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सचिव प्रेमराजजी भाला यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाली.

यावेळी सदर बैठकीला शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक रामदासजी निमावत,सहदेवराव सुरडकर, सुनीलजी लाहोटी विद्यालयाचे पालक संचालक गोपालजी बोरा तसेच शाळा निरीक्षण समितीचे अध्यक्ष सुभाषजी फटींग, शंकरराव भालेराव, रविंद्रजी बोंद्रे हे उपस्थित होते . स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य जयेशजी पातूरकर, राजकुमारजी सारडा, सुनीलजी बियाणी, नागेशजी राजबिंडे, दत्तात्रय गायकवाड आणि सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होते. यावेळी मान्यवराच्या हस्ते माता सरस्वती व स्वर्गीय मदनसा पातूरकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सरस्वती




वंदना घेऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. आपल्या प्रास्ताविकामधून प्राचार्य रमेश जाधव यांनी दरवर्षी होत असलेल्या आढावा बैठकीची पार्श्वभूमी आणि आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. यानंतर प्राचार्य रमेश जाधव यांनी आपला अहवाल सादर केला नंतर सेवाजेष्ठतेनुसार सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी आपला अहवाल सादर केला.

याप्रमाणे सर्वांचा वर्षभरातील शालेय-सहशालेय कामकाजाचा आढावा घेतला. याप्रसंगी संस्थेचे सन्माननीय सचिव प्रेमराजजी भाला यांनी आपल्या मार्गदर्शनातून उपस्थित सर्व शिक्षक बंधू भगिनींना विद्यार्थ्यांचे हित जोपासण्याच्या दृष्टीने अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व शिक्षकांनी सादर केलेल्या अहवालाविषयी समाधान व्यक्त करून प्राचार्य व शिक्षक बंधू-भगिनीचे भरभरून कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यानंतर स्थानिक सल्लागार जयेशजी पातूरकर यांनी दिवसेंदिवस विद्यालयाच्या होत असलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आणि सर्व शिक्षकांनी आपले कार्य अधिक निष्ठतेने व समर्पित भावनेने पार पाडावीत असे आवाहन केले.

आपल्या अध्यक्षिय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष रामकृष्णदादा शेटे यांनी उपस्थित शिक्षकांना विद्यार्थीहीत जोपासत असतानाच आपण शिक्षणासोबत देशसेवेसाठी संस्कारक्षम पिढीही घडवावी आणि या राष्ट्रासाठी सुसंस्कारित नागरिक तयार करावेत असे प्रतिपादन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गव्हले यांनी तर उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार संजय गवई यांनी मानले. शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# खडतर परिस्थितीवर मात करत नांदेड जिल्ह्यातील ६ जणांनी यूपीएससीत मिळवले घवघवीत यश

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :**

केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल मंगळवारी जाहीर असून अंतिम परीक्षेत नांदेड जिल्ह्यातील ६ जणांनी घवघवीत यश मिळविलं आहे. लॉन्ड्री काम करणाऱ्याच्या मुलानं आयआरएस ७८८ रँक घेत यश संपादन केलं. तर दुसरीकडं पुजाऱ्याच्या मुलानं यूपीएससीत ३३६ रँक पटकावत यश प्राप्त केलंय. कृष्णा जाधव पाटील यांनी वडिलांच्या मृत्यूनंतरही खचून न जाता रँक १९७ घेत यश संपादन केलं आहे.

कृष्णा बब्रुवान पाटील कुदळीकर हे मुळचा लातूर जिल्ह्यातील कुदळी येथील रहिवासी आहेत. त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. नांदेड येथे काका-काकुकडे राहून यूपीएससीची तयारी पूर्ण केली. तिसऱ्या प्रयत्नात त्यानं हे यश संपादन केलं. दहावीच्या उंबरठ्यावर असताना त्यांच्या वडिलांचे निधन झालं. वडील आणि आजोबांनी पाहिलेल्या स्वप्नाचा पाठलाग करत त्यांनी हे दैदिप्यमान यश संपादन केलं आहे.

नांदेड येथील लाँड्री चालकाचा मुलगा असलेला शिवराज राजेश गंगावळ यांनी आर्थिक परिस्थितीशी दोन हात करत संपूर्ण शिक्षण पूर्ण केलं. एमबीबीएस पूर्ण शिक्षण करून नांदेड येथे करुन वैद्यकीय अधिकारीपद मिळविलं. नांदेड जिल्ह्यातील बाराळी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र अधिकारी कर्तव्य बजावत असताना यूपीएससीची तयारी सुरू ठेवली. ध्येय गाठण्यासाठी निरंतर तयारी करुन सहाव्या प्रयत्नात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ७८८ रँक प्राप्त केला आहे.

महावितरणचे सेवानिवृत्त कर्मचारी अनिल राजूरकर यांचा मुलगा अतुल राजूरकर यांनीही दुसऱ्या प्रयत्नात यशाला गवसणी घालून ७२७ रँक प्राप्त केला आहे. दरम्यान, आनंद सदावर्ते यांनी यूपीएससी परीक्षेत ९४५ एआयआर रँक प्राप्त करत यश संपादन केले आहे. तसेच मुखेड येथील रहिवासी असलेला वेदांत माधवराव पाटील यांनी चौथ्या प्रयत्नात ६०१ रँक मिळवत यूपीएससी परीक्षेत यश मिळविले. तेही अभियांत्रिकी पदवीधर आहेत.

सहा जणांवर अभिनंदनाचा वर्षाव- लोहा तालुक्यातील रहिवासी असलेले सुनील रामलिंग स्वामी यांनी कठीण परिस्थितीचा सामना करत ३३६ रँक पटकावला आहे. त्यांचे वडील पुजारी आहेत. सुनील यांनी मावशीकडे राहून मोठ्या जिद्दीने तयारी करत यश संपादन केलं आहे. अतिशय अवघड मानल्या जाणाऱ्या यूपीएससी परीक्षेत नांदेड जिल्ह्यातून सहा जणांनी देदिप्यमान यश संपादन केले. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांना प्रेरणा मिळाली आहे. या सहा जणांनी यूपीएससी परीक्षेत यश प्राप्त केल्यानं त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मुंब्र्यात दहशतवाद्यांच्या पुतळ्याला दिली फाशी, दहशतवादी हल्ल्यातील मृतांना आदरांजली

**ठाणे/प्रतिनिधी :** काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष मर्जिया शानू पठाण यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शने करण्यात आली. या वेळी आंदोलकांनी दहशतवाद्यांच्या प्रतिकात्मक पुतळयास फाशी दिली. काश्मीरच्या पहलगाममध्ये




दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात सुमारे २६ जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. या घटनेच्या निषेधार्थ मुंब्रा - अमृतनगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष, यांच्यावतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी आंदोलकांनी दहशतवाद्यांच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. तसेच, दहशतवाद्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास फाशी दिली. या प्रसंगी मर्जिया पठाण यांनी, आज भारतातील कोणताच नागरिक सुरक्षित राहिलेला नाही. येथे मृत्यू स्वस्त झाले आहेत. आपण आज सुट्टीचा आनंद घेण्यासाठी पर्यटनास जाऊ शकत नाही. ही शोकांतिका असून त्यास सुरक्षा यंत्रणेतील फोलपणा कारणीभूत आहे. सर्वात दुर्दैवी म्हणजे, दहशतवादी हल्ल्यात हिंदू, मुस्लीम धर्मियांसह अन्य धर्मिय लोकही मारले गेले आहेत. तरीही, गुन्हेगाराला शोधण्याऐवजी धर्म शोधला जात आहे, हे अतिशय वाईट आहे. हिंदू धर्म ज्या प्रमाणे झुंडशाहीला मान्यता देत नाही. त्याचप्रमाणे इस्लामदेखील कोणाचे प्राण घ्यायला परवानगी देत नाही. अन् असे कृत्य करणाऱ्यास घरात घुसून मारले पाहिजे. आज या हल्ल्यानंतर ज्या पद्धतीने सत्ताधारी विधाने करीत आहेत. त्याकडे पाहता, सत्ताधाऱ्यांना देशभर दंगे भडकावयाचे आहेत, असेच चित्र दिसत आहे. त्याचा निषेध तर आम्ही करतोच पण जे कोणी या हल्ल्याच्या मागे आहेत. त्यांनाही फाशी दिले पाहिजे, अशी मागणी केली.

# आदिलभाईंनी घरी नेऊन जेवू घातले, सुखरुप पोहोचवले

## काश्मीरमधीले माणुसकीचे उदाहरण, रुपाली ठोंबरेंच्या डोळ्यात पाणी

**दैनिक आपला विदर्भ**




**मुंबई/प्रतिनिधी** :जम्मू-काश्मीरच्या पहलगामध्ये दहशतवाद्यांच्या हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. त्यामध्ये, महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी आहेत. मात्र, दहतवाद्यांनी धर्म विचारला आणि गोळ्या मारल्याचे काही पर्यटकांनी म्हटल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, दुसरीकडे देशभरातून पहलगामध्ये पर्यटनासाठी गेलेल्या भारतीयांच्या मदतीलाही तेथील मुस्लिम टुरिस्ट गाईड, ड्रायव्हर हेच पोहोचल्याचंही दिसून आलं. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाच्या महिला नेत्या रुपाली ठोंबरे यांनी एक व्हिडिओ शेअर केला असून त्यात संपूर्ण कहानी सांगितला. आदिलभाईंनी दाखवलेला माणुसकीचा धर्म सांगताना रुपाली ठोंबरेंच्या डोळ्यातही अश्रू तरळले होते. सध्या हा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

आदिल हे ड्रायव्हर असून त्यांनी नाशिकच्या पर्यटकांना त्यांच्या घरी नेऊन जेवायला घातलं. त्यानंतर, सुखरुपपणे एका हॉटेलमध्ये पोहोचवलं. आदिलभाईंच्या मदतीची आणि माणूसकीची कहानी सांगताना कधीकाळी हिंदुत्ववादी पक्षाच्या महिला नेत्या असलेल्या रुपाली ठोंबरे यांच्याही डोळ्यात पाणी आलंय. टुरिस्ट ॲक्टीव्हीस्ट आदिलभाईंनी यांना जी मदत केलीय ती शब्दात सांगू शकत नाही, असे म्हणताच रुपाली ठोंबरे गहिवरल्याचं दिसून आलं. आदिलभाई रडायला लागले आहेत, कारण त्यांचा धंदा पूर्णपणे बुडालेला आहे. आता, इथे कुणीही पर्यटक येणार नाहीत. यांनी सगळ्या गाड्या लोनवर घेतलेल्या आहेत. यापुढे, त्यांना कुठलाही रोजगार मिळणार नसून मोठी बेरोजगारी आता यांच्यावर येणार असल्याचेही रुपाली ठोंबरे यांच्यासममवेत असलेल्यांनी म्हटले.

विमानाची सोय करुन द्यावी - ठोंबरे

माझी सरकारकडे विनंती आहे की, तुम्हाला जी कारवाई करायची आहे, ती करा पण पर्यटकांना त्यांच्या घरी तातडीने पोहचवण्याची तयारी करा. इथे परिस्थीती बिकट आहे. अनेक लहान मुले आमच्यासोबत आहेत. ते सेफ नाहीत. मी माझ्याकडून उपमुख्यमंत्री अजित पवारांशी बोलून आणि मुरलीधर मोहोळ यांच्याशी बोलून विमानाची सोय करून द्या अशी विनंती केली आहे. तातडीने सर्व मदत करून द्यावी, पर्यटकांना लवकरत लवकर बाहेर काढणं गरजेचं आहे, असंही ठोंबरे यांनी म्हटले आहे.

ज्यांनी कृत्य केले ते हैवान - ड्रायव्हर आदिल

जे झाले ते अत्यंत दुर्दैवी आहे, हे व्हायला नव्हते पाहिजे. येथील अर्थकारण हे पर्यटनावरच अवलंबून आहे. इथे लहान-लहान मुलेही होती. ज्या कुणी हे कृत्य केलंय ते हैवानच आहेत, ते माणूस असूच शकत नाहीत, असे म्हणत टुरिस्ट ड्रायव्हर आदिलभाईंनी घडलेल्या घटनेवर दु:ख आणि शोक व्यक्त केलाय. चूक कोणीतरी एकजण करतंय पण बदनाम सर्वजण होतात. ही माणूसकीची हत्या आहे, असे आदिलभाई यांनी या व्हिडिओत बोलताना म्हटले.

हिंदू संकटात असताना मुस्लिम मदतीला येतात

ही कश्मीरची वस्तुस्थिती... रूपाली ठोंबरे आपल्या कुटुंबासह सहलीला गेल्या होत्या. त्यांच्यासह जवळपास १०० लोक अडचणीत आल्यानंतर स्थानिक आदिलभाई यांनी आश्रय दिला सगळ्यांच्या जेवणाची व्यवस्था केली. आतंकवाद्यांनो, हेही चित्र एकदा बघून घ्या... हिंदू संकटात असताना मुस्लिम मदतीला धावून येत आहेत. पर्यटन बंद झाले तर कश्मीरी मुस्लिम उपाशी मरेल या विचाराने हिंदूंच्या डोळ्यात पाणी येत आहे, अशी भावनिक पोस्ट सुषमा अंधारे यांनी लिहिली आहे. राजकारण करणाऱ्या नेत्यांनो आणि गोबरभक्तांनो हा हल्ला जात किंवा धर्मावरचा नाही हा हल्ला माणुसकीवरचा आहे. हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावरचा आहे. ऊरी , पठाणकोट, पुलवामा आणि आता पहलगाम झाल्यानंतरही अजूनही कुणाला वाटत असेल की हा देश सुरक्षित हातात आहे तर शोकांतिका आहे, असे म्हणत केंद्र सरकारवर देखील सुषमा अंधारे यांनी निशाणा साधला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी
# हेल्पलाईन क्रमांक जाहीर, नोंद करुन घ्या!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काश्मीरची भूमी पुन्हा एकदा दहशतवादी हल्ल्यामुळे हादरली आहे. पहलगाम येथे मंगळवारी दहशतवादी हल्ला झाला ज्यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यू झालाय. या हल्ल्यामुळं संपूर्ण भारतात खळबळ उडाली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार १० दहशतवाद्यांनी पहलगाम येथे आलेल्या पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यानंतर केंद्र सरकार अलर्ट झाले आहे तर पंतप्रधान मोदी सौदी दौरा अर्धवट सोडून दिल्लीत दाखल झाले आहेत. दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये महाराष्ट्रातील काही पर्यटकांचाही समावेश आहे.

पहेलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यामुळे काश्मीरच्या विविध भागात महाराष्ट्रातील पर्यटक




आणि त्यांचे नातेवाईक अडकले आहेत. आम्हाला महाराष्ट्रात सुरक्षित न्या, अशी मागणी पर्यटकांकडून केली जाते. या पर्यटकांच्या मदतीसाठी मंत्रालयातील महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या ०२२-२२०२७९९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन, करण्यात आले आहे.

या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष संपूर्ण वेळ (24X7) कार्यरत आहे. या हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह श्रीनगरवरून मुंबई येथे आज आणण्यात येणार आहेत. आज दुपारी श्रीनगर येथून महाराष्ट्रातील आणि गुजरातमधील मृतदेह विमानाने मुंबई विमानतळावर येणार आहेत. तेथून हे मृतदेह ॲम्बुलन्सद्वारे त्यांच्या गावी पाठविण्यात येणार आहेत. यासाठीची सर्व प्रकारची मदत राज्य शासनामार्फत करण्यात येत आहे. काश्मीरमध्ये अडकलेले पर्यटक आणि राज्यातील त्यांचे नातेवाईक यांनी मदतीसाठी ०२२-२२०२७९९० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात आले आहे.

**काश्मीरमधील संपर्क क्रमांक:**

श्रीनगर जिल्हा प्रशासनाने पर्यटकांना आपत्कालिन परिस्थिती संपर्क साधता यावा यासाठी श्रीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात 24X7 मदत कक्ष आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. दूरध्वनी क्रमांक ०१९४-२४८३६५१, ०१९४-२४६३६५१, ०१९४-२४५७५४३ आणि व्हॉट्सॲप क्रमांक ७००६०५८६२३, ७७८०८०५१४४, ७७८०९३८३९७ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**डोंबिवलीतील हेमंत जोशी यांचा मृत्यू**

पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात डोंबिवलीतील तीन पर्यटकांचा मृत्यू झालाय डोंबिवलीतील पश्चिम भागशाळा मैदान इथल्या सावित्री अपार्टमेंटमध्ये राहणारे हेमंत जोशी या हल्ल्यात मृत्यू पावलेत. मुलाची दहावीची परीक्षा संपल्यानंतर हेमंत जोशी हे आपल्या पत्नी व मुलासह फिरण्यासाठी काश्मीरला गेले होते. मात्र काल दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारत हेमंत जोशी यांचा मृत्यू झालाय. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच आजूबाजूच्या रहिवाशांमध्ये, शेजाऱ्यांमध्ये शोककळा पसरलीय. त्यांच्या कुटुंबीयांनी, आजूबाजूच्या रहिवाशांनी या हल्ल्याचा निषेध व्यक्त केलाय. सरकारने ठोस पावलं उचलण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

## पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यावर अभिनेता शाहरुख खानची मोठी प्रतिक्रिया; म्हणाला...

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खान याने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटकांचा मृत्यू झालाय. या हल्ल्यानंतर संपूर्ण देशभरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा जणांचा मृत्यू झालाय. यामध्ये पुणे, डोंबिवली आणि पनवेलमधील नागरिकांचा समावेश आहे. दरम्यान, संपूर्ण बॉलिवूड आणि मनोरंजन क्षेत्रातील अभिनेत्यांनी या हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे. शाहरुख खानने ट्विटरवर लिहिले की, पाहलगाममध्ये घडलेल्या विश्वासघातकी आणि अमानवी हिंसक घटनेमुळे होणारं दु:ख आणि राग शब्दात व्यक्त करता येत नाही. अशा काळात, आपण केवळ देवाकडे त्या पीडित कुटुंबांसाठी प्रार्थना करू शकतो आणि आपल्या अंत:करणातून शोक व्यक्त करू शकतो. हे दु:खद प्रसंग झेलणाऱ्या प्रत्येकाच्या पाठीशी माझ्या मनापासून संवेदना आहेत. एक राष्ट्र म्हणून आपण सर्वजण एकत्र, बळकट उभे राहू आणि या अमानवी कृत्याविरुद्ध न्याय मिळवू.

## चोपड्यात बोगस कापसाचे बियाणे हस्तगत, १७ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; एकावर गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यातील चुंचाळे परिसरात बोगस बियाणे विक्रीसाठी आणले असल्याची गोपनीय माहिती जिल्हा बियाणे निरीक्षक यांच्या पथकाला मिळाल्याने त्यांनी चोपडा शहर पोलीस स्टेशनचे मदतीने चुंचाळे अकुलखेडा रस्त्यावर तपासणी केली असता त्या ठिकाणी मान्यता नसलेल्या गुजरात राज्यातून विक्रीसाठी आणलेल्या निर्भया गोल्ड वाणाचे १४३ पाकीट व सुपर किंग वाणाचे ११३० पाकीट त्यांची किंमत १७ लाख ८२ हजार दोनशे रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चोपडा शहर पोलीस स्टेशनला एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर या पथकामध्ये विकास बोरसे, विजय पवार, किरण पाटील व पोलीस कर्मचारी यांनी या कारवाईस भाग घेतला या वर्षातील चोपडा तालुक्यातील ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे बोलले जात आहे. सदर शेतकरी व बियाणे विक्रेते यांना आवाहन करण्यात आले आहे की सदर मान्यताप्राप्त नसलेल्या बियाणे विक्री अथवा खरेदी करू नये अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## बारामती हादरली! ११ वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार; घरात कोणी नसल्याचे पाहून आरोपीने...

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** बारामती तालुक्यातील मुर्टी येथे अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. येथील एका ११ वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करण्यात आला आहे. सदर घटनेची माहीती मिळताच वरीष्ट अधिकारी, समाजसेवकांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.

घरात कुणीही नसल्याचं फायदा घेऊन एका ११ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार केल्याची घटना बारामती तालुक्यातील मूर्टी येथे घडली आहे. या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. अण्णा किसन गोफणे (रा. म ोराळवाडी, ता. बारामती) असं या प्रकरणी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मंगळवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास पिडीत मुलगी ही घरात एकटी होती. त्यावेळी आरोपी अण्णा गोफणे याने जबरदस्तीने घरात प्रवेश करत या चिमुरडीवर अत्याचार केला. ही घटना सम जल्यानंतर संबंधित पीडितेच्या कुटुंबीयांनी वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात धाव घेतली.

घटनेच्या ठिकाणी पंचनामा करताना बारामतीचे उपविभागीय दंडाधिकारी वैभव नारवडकर, बाराम तीचे उपविभागीय पोलीस अधिक्षक डॉ. सुदर्शन राठोड व आदिवासी समाजसेवक नामदेव भोसले, सर्व तपासी अधिकारी आणि पिढीत कुटुंबातील सदस्यांबरोबर स्थानिक ग्रमस्त उपस्थित होते. सदर घटनेमुळे पुणे जिल्हा हादरला असून पुणे जिल्हामध्ये आदिवासी लोकांवर अन्यायाच्या घटना वाढत आहेत. हे आदिवासी लोक पोटाची खळगी भरण्यासाठी वन-वन भटकंती करतात आणि हे पिडीत लोक शासकीय सोयीसुविधांपासून वंचित राहातात. अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे आदिवासी लोकाकांची उपामार होत आहे, असे मत नामदेव भोसले यांनी व्यक्त केले आहे. या प्रकरणामधील आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली जात आहे.

या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिसांनी अण्णा गोफणेवर भारतीय न्यायसंहिता कलम ६५ (२), ३३२ (अ), बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४ (२), ६, अनुसूचित जाती जमाती कायदा कलम ३(१) नुसार गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे. याबाबत अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड हे करीत आहेत.

## गडचिरोलीच्या आदिवासी पाड्यावरील 'शुभम'कडून पहिल्याच प्रयत्नात गड सर

**गडचिरोली/प्रतिनिधी :** साडेचारशे लोकसंख्या असलेल्या खेडेगाव (ता. धानोरा) येथील पाड्यावर राहणाऱ्या आदिवासी तरुणाने अथक परिश्रम व जिद्दीच्या जोरावर यूपीएससीमध्ये यश संपादन केले. शिक्षक काका व काकूंनी शिक्षणासाठी दिलेल्या पाठबळाच्या जोरावर पुतण्याने पहिल्याच प्रयत्नात यशाला गवसणी घातली. शुभम ईतवारी तुलावी (२४) असे त्याचे नाव आहे. आयपीएस कॅडर मिळाल्यानंतर पुन्हा यूपीएससी क्रॅक करणाऱ्या राहुल आत्राम यांच्यानंतर शुभम तुलावी याने चमकदार कामगिरी केल्यामुळे गडचिरोली जिल्ह्याने पहिल्यांदाच यूपीएससीमध्ये दुहेरी यश नोंदवले आहे.

शुभम तुलावी हा खेडेगाव (ता. धानोरा) येथील सर्वसामान्य आदिवासी कुटुंबातील आहे . त्याचे वडील ईतवारी तुलावी हे सार्वजनिक बांधकाम विभागात चतुर्थश्रेणी कर्मचारी होते. ते आता निवृत्त झाले आहेत. आई अमरबाई अल्पशिक्षित आहे. शुभमचे काका जगनसाय व काकू माया हे शिक्षक आहेत. शुभमचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जि.प. शाळेत झाले. पाचवीनंतर ते बारावीपर्यतचे शिक्षण ब्रम्हपुरी (ता. चंद्रपूर) येथे पूर्ण केले. पुढे काका जगनसाय व काकू माया यांनी त्यास पाठबळ दिले. शिक्षणासाठी पैसा तर पुरवलाच, पण योग्य मार्गदर्शनही केले. शुभमनेही त्यांचा विश्वास सार्थ ठरवत जिद्दीला परिश्रमाची जोड देत अभ्यास केला अन् यूपीएससची गड सर करुन दाखवला.

## दहशतवादी हल्ल्याचा देशभरात निषेध

### आतंकवाद्यांना शोधून त्याचा खत्मा करावा

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे आतंकवाद्यांनी हल्ला करून निरपराध २६ लोकांची अमानुष हत्या केली. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. मोदी सरकारने जम्मू कश्मीर मध्ये कलम ३७० हटविल्यानंतर जम्मू कश्मीर मध्ये शांतता बहाल व्हायला लागली होती. पर्यटन ही वाढायला लागले होते. जम्मू कश्मीर विकासाच्या पथावर असताना पाकिस्तानच्या आतंकवादांना ही बाब सहन झाली नाही. पुन्हा जम्मू कश्मीर मध्ये आतंकवादी कारवाया वाढूवुन येथील शांतता भंग करण्याचा त्यांचे मनसुबे आहे. पाकच्या आतंकवाद्यांनी आता पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून त्यांच्यावर अमानुष गोळीबार केला हा हिंदू धर्मावर व देशावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ आज बुलढाण्यात भाजपाच्या वतीने निषेध व्यक्त करत निदर्शने करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. भारतीयांच्या मनावरील आघात असून केंद्र सरकारने लवकरात लवकर त्या आतंकवाद्यांना शोधून त्यांचा खात्मा करावा व पुन्हा अश्या प्रकारचा आतंकवादी हल्ल्या करतांना हजार वेळेस विचार करतील असा बंदोबस्त करावा.

**– विजयराव शिंदे, माजी आमदार बुलढाणा.**

### कश्मीरला लुळ पांगळा करण्याचा आंतरराष्ट्रीय कट

ठाणे : भारतावरचा हल्ला आहे. काश्मीरची आर्थिक परिस्थिती सुधारत होती. कश्मीर मधली पर्यटकांची गर्दी वाढत होती.कश्मीर पूर्वपदावर येत होते. लोक असे म्हणतात स्वित्झरलँड पेक्षा काश्मीर सुंदर आहे. हा पर्यटकांवरील हल्ला नाही हा काश्मीरी लोकांवर चा हल्ला आहे. प्रश्न पोटापाण्याचा आहे. आता पोटापाण्यावर आलेला आहे. त्यांच्या यात हिंदू मुसलमान काही प्रश्नच येत नाही. त्या लोकांनी ने काय केले. हा नीच आणि घाणेरडा प्रकार आहे. गेल्या चार वर्ष मिलेक्ट्रीमध्ये भरती झालेली नाही.जवानांची संख्या दोन लाखांनी कमी झाली. काय जागतिक शांततेचा करार झाला होता का? आपल्यावर पाकिस्तान बांगलादेश आपले जे दुश्मन राष्ट्र आहेत. यांच्यातून कारवाया होणार नाही, असा गोड गैरसमज झाला होता का? जेवण एक वेळेस कमी केले, तरी चालेल पण सीमा सुरक्षित राहिली पाहिजे. कडक मिलिटरी बंदोबस्त असेल तर अतिरेकी कारवाया होत नाहीत. कश्मीरला लुळ पांगळा करण्याचा आंतरराष्ट्रीय कट आहे. याच्यात पाकिस्तान सामील आहे.

**–जितेंद्र आव्हाड, आमदार ठाणे.**

### हल्ल्याच्या निषेधार्थ काँग्रेसचे आंदोलन

**मुंबई :** काश्मीरच्या पहलगाम या ठिकाणी पर्यटकांवर अतिरेक्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यात महाराष्ट्राचे सहा पर्यटक मृत्यूमुखी पडले. या हल्ल्याचा काँग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात निषेध करण्यात आला. हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर काँग्रेसच्या टिळक भवन कार्यालयाबाहेर येऊन असंख्य कार्यकर्त्यांनी या भ्याड हल्लाचा निषेध केला.

**–हर्षवर्धन सपकाळ, प्रदेशाध्यक्ष,
काँग्रेस कमिटी महाराष्ट्र राज्य.**

### आतंकवाद्यांवर कठोर कारवाई करावी

**भंडारा :** जम्मू काश्मीर अतिरेकी हल्ल्यातील आतंकवाद्यांना लवकरात लवकर पकडून कठोर कारवाई करावी, अशी मागणी सुरेश म्हात्रे यांनी केली. तर, जम्मू-काश्मिरमधील पहलगाममध्ये येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला असून या हल्ल्यातील आतंकवाद्यांना केंद्र सरकारने लवकरात लवकर पकडून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व अशा भ्याड हल्ल्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा.

**–सुरेश म्हात्रे, खासदार, भिवंडी.**

### देशात दोन धर्मात वाद लावणे, देश अस्थिर करणे हा डाव असू शकतो

**मुंबई :** पहलगाममध्ये झालेल्या दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. भारतीयांवर आणि भारतावरचा हल्ला झाला आहे.सरकारचे अपयश, इंटेलिजन्स फेल्युअर आहे. जे पर्यटक आहे त्यांना सुरक्षित घरी नेले पाहिजे. जिथे एवढे पर्यटक असतात तिथे पोलिस किंवा सैन्याचे सुरक्षा नव्हती. हल्ला झाल्यानंतर सैन्य पोहचले. देशात दोन धर्मात वाद करणे, देश अस्थिर करणे हा डाव असू शकतो.

**–विजय वडेट्टीवार, आमदार मुंबई.**

### दहशतवादी हल्ल्यामध्ये पनवेल कामोठे येथील दोन नागरिक जखमी

**नवी मुंबई :** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये पनवेल कामोठे येथे राहणारे निवृत्त जीएसटी अधिकारी सुबोध पाटी जखमी झाले.त्याच्या सोबत त्याची पत्नी माणिक पाटील या देखील होत्या. आता सुबोध पाटील यांची प्रकृती ठीक असून फोन वरून त्याचायशी बोलणे झाल्याचे सुबोध पाटील यांची मुलगी प्राची पाटील यांनी सांगितले. तर, शेजारी देखील आई व वडील सुखरूप असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्याचबरोबर सुबोध पाटील यांच्या शेजाऱ्यांनी आणि मित्र यांनी देखील सुबोध पाटील यांची चौकशी केली.

**–प्राची पाटील,सुबोध पाटील यांची मुलगी.**

### भारत सरकारने सडेतोड उत्तर द्यावे

**धुळे :** जम्मू काश्मिरातील पहलगाम येथे आतंकवाद्यांनी भ्याड हल्ला करून निरपराध पर्यटकांचा जीव घेतला आहे. या घटनेविरोधात सर्वत्र संताप व्यक्त केला जात असून, आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीनेही या धुळे महानगर पालिकेच्या बाहेर या निंदनीय घटनेचा निषेध करण्यात आला. यावेळी पाकिस्तानचे कागदी ध्वज जाळण्यात येवून पाक विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हा पाक दहशतवादी हल्ला आहे. यात निष्पाप लोकांचा जीव गेला. त्यामुळे भारत सरकारने या हल्ल्याचे सडेतोड भाषेत उत्तर द्यावे.

**–रणजित भोसले, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस.**

## भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागात सुद्धा पाण्याची समस्या वाढू लागली

दैनिक आपला विदर्भ





**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागात सुद्धा पाण्याची समस्या वाढू लागली आहे. उन्हाच्या झळा वाढू लागल्या अनेक गावापाड्या वस्त्यांवर पिण्याच्या समस्या जाणवू लागले आहे. तालुक्यातील चिंबीपाडा रस्त्या वरील जुनांदुरखी ग्रामपंचायत हद्दीतील राईपाडा असून या शंभर घरांच्या आदिवासी वस्तीवरील कुटुंबियांना पिण्याच्या पाण्यासाठी दिवसरात्र जागून झऱ्यातून येणाऱ्या थेंबे थेंबे पाण्याने आपला हंडा भरण्याची वेळ आली आहे.

या पाड्यांवर मागील कित्येक वर्षांपासून पाण्याची समस्या आहे. या ठिकाणी जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नळ योजना राबविण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च केले गेले. पण आज ही येथे पाण्यासाठी उन्हातान्हात महिला नव्याने बांधण्यात येत असलेल्या विहिरीच्या लगत असलेल्या झऱ्यातून झिरपणाऱ्या पाण्यावर आपली तहान भागवण्यासाठी थांबून रहावे लागत आहे. तरी प्रशासनाने या गावाकडे लक्ष देण्याची मागणी महिलांकडून करण्यात येत आहे.

रायपाडा असून इथून एक दोन किलोमीटरचे जास्त दूर आहे इथं अशी पाण्याची टंचाई आहे का दुपारभर पाण्याला रात्री भर पाणी भरतो आम्ही पाण्याची पाणी खोदून पाणी पितोय आहे पाण्यामध्ये कुत्री जनावर अशी जाऊन पाणी पितात तेच पाणी आम्ही पितो एवढी वर्षी आम्ही घाणीतच पाणी पेत होतो सरकारकडे आम्ही मागणी करतो ग्रामपंचायतकडे मागणी करतो टँकर टाकणार टँकर टाकतो अशी आश्वासने देतात आम्ही सांगतो की आम्हाला पाणी कधी देणार दोन वर्ष झाले तरी प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे.

## विविध वृत्त...

### अकोला, बुलडाणा येथील प्रवासी सुखरूप

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** 'गुरूमाऊली टुर्स'च्या माध्यमातून काश्मिर येथे पोहोचलेले ३१ प्रवासी सुखरूप असल्याची माहिती प्राप्त झाली असून, तसे राज्य नियंत्रण कक्षाला कळविण्यात आले, तसेच प्रवाश्यांशी संपर्क करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातर्फे देण्यात आली.

पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्याच्या दुर्घटनेच्या अनुषंगाने 'गुरूमाऊली टुर्स अँड ट्रॅव्हल्स'चे समन्वयक अंबादास सप्रे यांच्यामार्फत दूरध्वनी संदेशान्वये जिल्हा नियंत्रण कक्षाला माहिती प्राप्त झाली. त्यानुसार या कंपनीने काश्मिर येथे यात्रा आयोजित केली. त्यात अकोला, बुलडाणा व पुणे येथील ३१ प्रवासी रेल्वेने काश्मिर येथे पोहोचले आहेत. सद्य:स्थितीत हे पर्यटक श्रीनगर येथील डल लेकजवळ असलेल्या हॉटेलमध्ये मुक्कामी असून, सर्व सुखरूप असल्याची माहिती श्री. सप्रे यांच्याकडून नियंत्रण कक्षाला मिळाली. ही माहिती मिळताच जिल्हा नियंत्रण कक्षातर्फे तातडीने माहिती व संबंधित यादी राज्य नियंत्रण कक्षाला कळविण्यात आली, तसेच प्रवाश्यांशी संपर्क करण्यात येत आहे, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातर्फे कळविण्यात आले आहे.

### सवड येथे तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील सवड येथे एका युवा तरुण अविवाहित शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना दिनांक २३ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता च्या दरम्यान उघडकीस आली. विशाल लक्ष्मण



कोल्हे ३० वर्ष राहणार सवड असे मृताचे नाव असून त्याने त्याच्या सवड शेत शिवारातील शेतात लिंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. सदर घटनेची माहिती मिळतात रिसोड पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आला. तत्पूर्वी घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा केला. विशाल च्या आत्महत्येचे कारण अद्याप कळू शकले नाही. विशालने लिंबाच्या झाडाला गळफास लावल्याच्या अवस्थेत तो शेतातील काम करत असलेल्या शेतमजुरांना दिसून आला व गावात एकच खळबळ उडाली. विशालने आत्महत्या केल्याची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी ग्रामस्थांनी एकच गर्दी केली. विशाल हा गेली काही दिवसापासून शेती संबंधित पीक उत्पन्न कर्ज आदी बाबतीत तो विवंचनेत होता असे चर्चेतून कळाले आहे

### पहलगाम येथील हल्ल्याची जबाबदारी स्वीकारत गृहमंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा; शिवसेना आक्रमक



**धुळे/प्रतिनिधी :** जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यात आतापर्यंत २७ पर्यटकांचा मृत्यू झाल्याचे समजते. यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष चांगलाच आक्रमक झाल्याचे बघायला मिळत आहे. आज धुळे शहरातील संतोषी माता चौकात ठाकरे सेनेच्या वतीने पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ पाकिस्तानचा झेंडा जाळत, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केंद्रीय गृहमंत्री असल्याच्या नात्याने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारत राजीनामा द्यावा अशी मागणी ठाकरे सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

### पाण्याच्या मागणीसाठी ग्रामपंचायत कार्यालयावर घागर मोर्चा

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड शहरालगत असलेल्या पासद गाव ग्रामपंचायत येथील नवीन वस्तीमध्ये मागील आठ दिवसापासून पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयावर घागर मोर्चा काढत निषेध व्यक्त केला. पासद गावच्या नवीन वस्तीची लोकसंख्या २५० ते ३०० आहे. तरी सुद्धा ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे घागर मोर्चा काढण्यात आला. येत्या दोन दिवसात पाणीपुरवठा न झाल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



# बुलढाणा जिल्हयातील ५० पर्यटक जम्मू काश्मिरमध्ये!

- सुखरुप घरी पोहचविण्यासाठी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कार्यालयाशी साधला संपर्क
- गृह विभागाच्या मदतीने करण्यात येत आहे प्रयत्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जम्मू काश्मिरातील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्यानंतर भयभित झालेले आणि जम्मू काश्मिरमध्ये बुलढाणा जिल्हयातील सुमारे ५० नागरीक अडकुन पडले आहेत. त्यांनी घरी सुखरुप पोहचविण्याच्या दृष्टीकानातुन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला आहे.

गृह विभागाच्या मदतीने उपाययोजना करण्यात येत असल्याची माहीती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन देण्यात आली आहे.

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्याचा शिवसेनेच्या वतीने निषेध नोंदविला आहे. केंद्र सरकारने केलेल्या विविध उपाय योजनांमुळे जम्मू काश्मिरमध्ये पर्यटकांचा ओढा वाढलेला असतांना देशामध्ये धर्माच्या नांवावर विभाजन करण्याच्या दृष्टीकोनातुन दहशतवाद्यानी जम्मू काश्मिरमध्ये गेलेल्या पर्यटकांवर लक्ष करत गोळीबार केला. यामध्ये २६ जण मृत्युमुखी पडले असुन त्यातील ६ जण हे महाराष्ट्रातील आहेत. बुलढाणा जिल्हयातील जवळपास ५० पर्यटक जम्मू काश्मिरमध्ये पर्यटनांसाठी गेलेले आहेत हे सर्व पर्यटक सुखरुप आहेत.

अनेकांनी केंद्रीयमंत्री तथा जिल्हयाचे खासदार प्रतापराव जाधव यांच्या दिल्ली येथिल कार्यालयाशी संपर्क साधला असुन त्यांना घरी सुखरुप पोहचविण्याच्या दृष्टीकोनातुन प्रयत्न करण्यात येत आहे. बुलढाणा येथिल पत्रकार अरुण जैन यांच्या कुटूंबातील ५ व्यक्ती जम्मू काश्मिर पर्यटनासाठी गेलेले आहेत त्यांचे कुटूंबीय सुखरुप आहेत. इतर ४५ जण जम्मू काश्मिर मध्ये अडकुन पडलेले आहे दहशतवादी हल्यानंतर अडकुन पडलेले सर्व पर्यटक भयभित झाले आहेत. त्यांची मागणी घरी सुखरुप पोहचण्याची आहे.



या संदर्भात गृह विभागाशी संपर्क साधण्यात आला आहे. त्या सर्वांना सुखरुप घरी पोहचविण्याच्या दृष्टीकोनातुन उपाययोजना करण्यात येत आहे. अशी माहीती केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन देण्यात आली आहे. दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्याचा शिवसेनेच्या वतीने निषेध करण्यात आला आहे.

# बेकायदेशीर बालगृहांची १०९८ वर माहिती द्या

## महिला व बालविकास विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आपल्या परिसरात कुठेही अनधिकृत, बालगृहे, वसतिगृहे चालवली जात असल्याचे आढळताच टोल फ्री क्रमांक १०९८ वर तत्काळ माहिती द्यावी व बालकांच्या शोषणास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

पुणे जिल्ह्यातील आळंदी आणि ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे विनापरवानगी बालगृहे, वसतिगृहे आणि अनाथाश्रम चालवले जात असल्याचे वृत्त माध्यमांद्वारे प्रसिद्ध झाले. या ठिकाणी बालकांना जबरदस्तीने ठेवून त्यांच्यावर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषण होत असल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. ही बाब अतिशय गंभीर असून बाल न्याय अधिनियम २०१५, सुधारित अधिनियम २०२१ आणि महाराष्ट्र बाल न्याय नियम २०१८ यांचे सरळ उल्लंघन आहे. या अधिनियमाच्या कलम ४२ नुसार, अशा प्रकारच्या संस्थांना आवश्यक ती मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक आहे. प्रमाणपत्राविना संस्था चालवणाऱ्या व्यक्तीस एक वर्षापर्यंत कारावास व किमान १ लाख रुपयांचा दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतो.

नागरिकांनी सजग राहून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे.

### पत्नी, सासूच्या त्रासामुळे जावयाची सासुरवाडीत आत्महत्या

**सोलापूर/प्रतिनिधी :** घरजावई तरुणास पत्नीच्या अनैतिक संबंधाच्या कारणावरून झालेल्या भांडणात असह्य त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नी आणि सासूसह चौघांजणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मोहोळ तालुक्यातील जामगाव येथे हा प्रकार घडला.बंडू आप्पा श्रीराम (वय ३४) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. या संदर्भात त्याचा भाऊ नवनाथ आप्पा श्रीराम (वय ४०, रा. खुपसंगी, ता. मंगळवेढा) यांनी कामती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार बंडू हा पत्नीसह दहा वर्षापूर्वी सासुरवाडीत, जामगाव (मोहोळ) येथे राहून सासूच्या नावे असलेली शेतजमीन कसत होता. त्याने आपल्या गावातील स्वमालकीची स्थावर मालमत्ता विकून त्यातील पैसा सासुरवाडीतील शेतजमिनीत गुंतविला होता. यातून शेती विकसित होऊन चार पैसे मिळत होते.तथापि, पुढे काही दिवसांनी पत्नीचे तिच्याच नात्यातील एका तरुणाबरोबर अनैतिक संबंध असल्याचे उघड झाले. तेव्हा अस्वस्थ झालेल्या बंडू श्रीराम याने पत्नी व सासूला जाब विचारला. त्यावरून सासुरवाडीत भांडणे सुरू झाली. यातच पत्नीच्या प्रियकराचे वडील तेथे येऊन शेती कसू लागले. त्यामुळे भांडण-तंटा वाढला आणि बंडू यास त्रास देणे सुरू झाले.

# धरणातील पाणी आटल्याने शेतकऱ्यावर संकट

## उभ्या पिकांत शेतकऱ्यांनी सोडली गुरे; उसनवारी फेडायची कशी शेतकऱ्यापुढे प्रश्न



दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी :** उन्हाळी पिके मुग, भुईमुग,दादर,मका या उभ्या पिकांना पाणी पुरवठा होत असलेल्या अडोळ डॅममधील (बोराळा धरण ) पाणी आटल्याने शेतकऱ्यांनी उभ्या पिकांत जनावरे सोडली आहेत. वाशिम जिल्ह्यातील अडोळ डॅमवरुन (बोराळा धरण ) हे रिसोड व शिरपुर शहराला पाणी पुरवठा केलेला आहे धरणाचे पाणी आटल्याने शहरवासी व धरणानजीकच्या बोराळा, खंडाळा शिंदे, वाघी, शेलगांव इंगोले, ताकतोडा, सिरसाळा, सोमठाणा, रिठद, ढोरखेडा, दापुरी, शेलगांव बगाडे,मुठ्ठा या गावासह इतरही धरणानजीकच्या गावातील शेतकऱ्यांनी धरणातील पाण्याच्या भरवश्यावर उन्हाळी पिकांची लागवड केली होती. आता धरणातील पाणी आटल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे.

यंदा सोयाबिणचे उत्पादना मोठ्या प्रमाणात घट झालेली होती.रब्बी हंगामातील पिकही जेमतेम झाल्याने शेतकरी आगोदरच अडचणीत होता तरीही या अडचणींवर मात करुन शेतकऱ्यांनी ऊन्हाळी पिक घेण्याचे धाडस करुन ऊन्हाळी पिकाची लागवड केली.

शेतकऱ्यांसमोर अडचणी ह्या नेहमीप्रमाणे निर्माण होतातच त्याप्रमाणे हिरवेगार डौलत असणारे पिके हे पाण्या आभावी सुकुन जात असल्याचे शेतकऱ्यांनाबघवले नाही त्यामुळे बोराळा येथील शेतकरी यांनी उभ्या पिकांत जनावरे सोडले आहेत, पाण्याआभावी असेही पिक वाळुन जात आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले गुरे पिकांत सोडण्याचा पर्याय निवडला आहे.कशीबशी उसनवारी करुन ऊन्हाळी पिकाची लागवड केली होती,पिकाच्या भरवश्यावर केलेली ऊसनवारी फेडायची कशी हा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला आहे.

# लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!

## या दिवशी खात्यात जमा होणार एप्रिल महिन्याचे १५०० रुपये

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाकडून महिलांसाठी लाडकी बहीण योजना राबवली जात आहे. दर महिन्याला या योजनेतील पात्र महिलांच्या खात्यात राज्य सरकारकडून १५०० रुपये दिले जातात. मात्र एप्रिल महिना संपत आला तरी अद्याप लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपये जमा झालेले नाहीत. त्यामुळे अनेक लाडक्या बहिणी सध्या १५०० रुपये खात्यात कधी जमा होतील याच्या प्रतीक्षेत आहेत. अशा बहिणींसाठी एक मोठी बातमी समोर येत असून मंत्री आदिती तटकरे यांनी एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांच्या खात्यात जमा होतील असं म्हटलं आहे.

एप्रिल महिना संपण्यासाठी आता अवघे आठ दिवस शिल्लक असून ३० एप्रिल पर्यंत महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये जमा होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. सध्या लाडक्या बहिणीच्या अर्जाची तपासणी सुरु असून, योजनेच्या निकषांनुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे. योजनेच्या निकषांनुसार ज्या महिलांचं उत्पन्न हे २.५० लाखांपेक्षा जास्त असेल अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. आतापर्यंत लाडकी बहीण योजनेतून ९ लाख अपात्र महिलांची नावे वगळण्यात आली आहेत.

लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांच्या अर्जाची पडताळणी विधानसभा निवडणूक संपल्यावर सुरु करण्यात आली. यात ज्या महिला या महाराष्ट्राच्या रहिवासी नाहीत तसेच ज्या सरकारी नोकरी करत आहेत अशांची पडताळणी करून त्यांना योजनेतून वगळण्यात आलं आहे.

# भरधाव कारचा अपघात दोन ठार, तीन जखमी

## समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक २९९.१ जवळील घटना

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** झोपेची डुलकी लागल्याने झालेल्या भीषण कार अपघातात दोन जण ठार तर, तीन जण जखमी झाले. सदर घटना समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक २९९.१ जवळ घडली.सदर अपघातात विकास कुमार, वय २८ रा. ठाणे व गुड्डू सिंग वय २८ रा. ठाणे अशी मृतकाची नावे आहेत. तर, तीन जण जखमी झाले आहेत. प्राप्त माहितीनुसार ईरटीका कारने विकास कुमार प्रभू सिंग रा. ठाणे हे ठाणे वरून बिहार करता नागपूर कॉरिडोरने जात असताना चॅनल नंबर २९९.१ वर झोपेची डुलकी लागल्याने चालकाचे वाहनावरून



नियंत्रण जाऊन कार महामार्गाचे मिडीयमला धडकून पुलाचे कठड्यावर आदळली. त्यामुळे घडलेल्या अपघात चालक विकास कुमार व त्याच्यासोबत असलेले गुड्डू सिंग हे दोघे जागेच ठार झाले. तसेच प्रदीप सुरेश चव्हाण वय १६ रा.ठाणे, मनीष कुमार प्रेमचंद सिंग वय २८ रा. ठाणे, नितेश कुमार वय ६ रा.ठाणे हे तिघे जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच पीएसआय जितेंद्र राऊत, पोलीस अमलदार गणेश उबाळे, अमोल हरमकर महाराष्ट्र पोलीस केंद्र फरदापुर येथे हजर असताना छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून नागपूर कॉरीडोर चेनेज नंबर २९९.१ वर अपघात झाल्याची माहिती मिळाल्याने तात्काळ अपघातस्थळी दाखल झाले. सदर जखमी व मृतक यांना ग्रामीण रुणालय मेहकर येथे ॲम्बुलन्सने रवाना केले. वाहतूक



सुरळीत सुरू असून अपघात घटनास्थळी पोलीस स्टेशन मेहकर स्टाफ घटनास्थळी दाखल झाला होता.